तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स : २२६६२१०२
E-mail:- desk3@dte.org.in Web:- http://WWW. dtemaharashtra.gov.in

महत्वाचे

क्रमांक : ३/तंशिसं/मातंकक्ष/२०१३/ 33
दिनांक : 17/10/2013

प्रति,
१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ अमरावती/ नाशिक
२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३) प्राचार्य,
सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
४) प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.

**विषय :- शासकीय कार्यालयाव्दारे संकेतस्थळे व ई-मेल वापरासंदर्भात माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून निर्गमित केलेल्या सल्ल्याबाबत...**
**संदर्भ :- माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.जीएडी-मातंसं-०७५/७/२०१३-डीआयआर-डीआयटी (एमएच), दि.३०/९/२०१३**

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकीत पत्र महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर **"नविन संदेश"** या विभागात उपलब्ध आहे. सदर पत्रात नमूद मुद्दे संकेतस्थळ, होस्टिंग, औपचारीक ई-मेल वापर, ई-प्रशासनाबाबत केंद्र शासनाची मानांकने, फ्रेमवर्क, क्लाऊड प्रणाली, संकेत स्थळांची सुरक्षा तसेच माहिती व तिच्या सुरक्षेसंबंधी असून महत्वाचे आहेत. या सर्व मुद्दयांचा विचार करुन सर्व शासकीय कार्यालयांनी आपले स्तरावर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सर्व विभागीय कार्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने आणि तत्सम संस्था यांनी संबंधीत पत्राची प्रत प्राप्त करुन घ्यावी व त्यानुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. ई-मेल बाबत

...1.9 minister_ppt MT-CET 2013\MT-CET 2013.doc

8487
21 OCT 2013

या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे व विस्तृत सूचना यथावकाश निर्गमित केल्या जातील. याबाबत अधिक माहिती / मार्गदर्शन पाहिजे असल्यास या कार्यालयातील **आय.टी. सेल** यांचेशी ई-मेल व्दारे संपर्क साधावा.

याव्दारे असेही कळविण्यात येते की, **www.dte.org.in** ऐवजी **www. dtemaharashtra. gov.in** या संकेतस्थळाचा वापर करण्यात यावा.

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई

प्रत :

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी.

२) सर्व सहसंचालक/ उपसंचालक/ सहा.संचालक/ कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई,

३) सर्व कार्यासने, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरीता. त्यांना निर्देश देण्यात येतात की, यापुंढे पत्रव्यवहार करतांना या कार्यालयाचा संकेत स्थळाचा नविन पत्ता नमुद करावा. तसेच टपाल खात्याकडून **टेलिग्राम** ही सुविधा बंद झाली असल्याने त्याबाबचा उल्लेख करु नये.